**"ऑक्टोबर २०२१" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ४ ऑक्टोबर २०२१ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१ अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या एक उपमुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास अधिकारी, गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक ६ ऑक्टोबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये नगरपालिका / नगर परिषद, मुख्याधिकारी, गट-अ आणि गट-ब संवर्गांचा समावेश करण्यात आला आहे.
- दिनांक ७ ऑक्टोबर २०२१ च्या शासन आदेशान्वये सेवापुस्तके संगणकीकृत करण्याच्या अनुषंगोन NIC मुंबई यांनी HRMS विकसित केलेल्या ई-सेवापुस्तक आज्ञावलीमध्ये मंत्रालयीन विभागात कार्यरत भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकांमधील माहिती भरण्याकरिता कार्यासन-अ/सापवि यांच्या पर्यवेक्षीय नियंत्रणाखाली तीन लिपिक-टंकलेखकांचा एक गट स्थापन करण्यात आला आहे. त्या गटात तीन लिपिक-टंकलेखकांच्या सेवा दिनांक ७ ऑक्टोबर २०२१ पासून एका महिन्यांकरिता अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.
- दिनांक ७ ऑक्टोबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांचे एका आठवडयाचे सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम प्रशिक्षणासाठी जाताना प्रशासकीय व्यवस्था करण्यासंदर्भात सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
- दिनांक १२ ऑक्टोबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत देण्यात येणाऱ्या तांत्रिक प्रशिक्षणासाठी अर्थसंकल्पित तरतुदींबाबत सर्व मंत्रालयीन विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक १४ ऑक्टोबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये विभागीय व जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांच्या दैनंदिन कामकाजावर विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या परिणामकारक संनियंत्रणाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी नियामक मंडळ आणि दैनंदिन कामकाजावरील नियंत्रणासाठी कार्यकारी मंडळ यांची रचना व त्या संस्थांची उद्दिष्टे विहित केली आहेत तसेच काही सूचनाही देण्यात आल्या आहेत.
- दिनांक १४ ऑक्टोबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ करिता वनामती, नागपूर या संस्थेस ऑक्टोबर २०२१ करिता ३६-सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली रु.४,०६,६४७/- इतके अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २१ ऑक्टोबर २०२१ च्या शासन निर्णयान्वये दक्षता जनजागृती सप्ताह हा दिनांक २६ ऑक्टोबर २०२१ ते १ नोव्हेंबर २०२१ या कालावधीत "स्वतंत्र भारत @ ७५ : सचोटीतून आत्मनिर्भरतेकडे या संकल्पनेसह साजरा करण्याच्या सूचना आहेत.

**(ख) नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक**

- महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत २४ सहायक कक्ष अधिकारी यांना मंत्रालयीन प्रशासकीय विभागात नियुक्ती देण्यात आली आहे.

**(ग) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त**

- भारतीय प्रशासन सेवेतील २९ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- एका सहसचिवाच्या बदलीस स्थगिती देण्यात आली आहे.

**(घ) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- कक्ष अधिकारी-२, सहायक कक्ष अधिकारी-१, उच्चश्रेणी लघुटंकलेखक-१ अशा ४ अधिकारी / कर्मचाऱ्यांनां प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली आहे.
- अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा ३ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- कक्ष अधिकारी-४, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा ५ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(च) <u>प्रशिक्षण / परीक्षा</u>**

- दिनांक २० ऑक्टोबर २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये अनुत्तीर्ण सहायक कक्ष अधिकाऱ्यांची कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी विभागीय परीक्षा-२०२१ या परीक्षेचा निकाल जाहिर करण्यात आला आहे.
- दिनांक २७ ऑक्टोबर २०२१ च्या परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०२१ या परीक्षेला पुन्हा बसू इच्छित असलेल्या उमेदवारांचे अर्ज दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ पर्यंत मागविण्यात आले आहेत.

*****